# शेतकऱ्यास भीक नको हक्क हवाय !

भारत हा कृषीप्रधान देश आहे. कोण्या एका काळी भारताला समृध्द शेतीमुळे **सोनेकी चिडिया** असं म्हटलं जायचं. अशी एक म्हण प्रचलित होती, 'उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी'. आज ही म्हण उलटी झालीय. आजचं वास्तव आहे, 'उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती'. सगळ्यांनाच जगण्यासाठी अन्नाची आवश्यकता आहे आणि स्वतंत्र भारतात गेल्या ६० वर्षात या अन्न पिकवणाऱ्या शेतक-याची मात्र अन्नानं दशा झालीये आणि तो आत्महत्येस प्रवृत्त होतो आहे.

भांडवली संचय (Capital accumulation) साठी शेतीची लूट इंग्रजांच्या काळापासून चालू आहे. स्वतंत्र भारतानेही तीच आर्थिक नीती अवलंबली आहे. इंग्रजांनी लेंकाशायर मॅन्चेस्टरच्या कापड गिरणीसाठी भारतातल्या कापूस उत्पादकांना लूटलं त्यांचं शोषण केलं. भारतात अहमदाबाद- मुंबईच्या कापड गिरण्यांच्या विकासासाठी स्वतंत्र भारताच्या कापूस उत्पादकांची लूट चालू आहे.

मार्क्सने म्हटलं होतं, भांडवली संचयासाठी कामगाराचं शोषण होतं. जर्मनीची महिला अर्थशास्त्रज्ञ श्रीमती रोझा लुक्झेमबर्ग हिने देखील म्हटलं होतं, की कच्च्या मालाच्या लुटीतूनच भांडवल संचय करण्यात येतो. इंग्रजांनी औद्योगिक विकासासाठी कितिक देशांचं अशा प्रकारे शोषण करुन करुन गुलाम बनवलं होतं. यालाच उपनिवेशवाद (Colonialism) म्हटलं जातं. १९९५ नंतर विश्व व्यापार संघटनेची स्थापना झाली. जगाचा व्यापार विशेषत: कृषी उत्पादनावरील व्यापार मुक्त असेल आणि या नीतीचा लाभ अविकसित आणि विकसनशील देशांना होईल असं म्हटलं गेलं होतं. परंतु वास्तव हेच आहे की १९९५ नंतर गरीब देशातील गरीब शेतकऱ्याचं अधिक शोषण झालं. आणि याचाच परिणाम १९९७ नंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्येचं प्रमाण वाढतच गेलं. १९९५ पूर्वी भारताच्या कापसाच्या आयात-निर्यातीवर सरकारचं नियंत्रण होतं. पण त्यानंतर कापसाची आयात-निर्यातीचं मुक्तधोरण लागू झालं. कापसाच्या आयातीवर १०% प्रति आयात कर होता. (Import Duty)

१९९४ मध्ये जागतिक बाजारपेठेत १ डॉलर, १० सेंट, १ पाऊंड, कापसाचा (Cotton lint) भाव होता. जो कमी होत होत १९९८-१९९९ मध्ये ४० सेंट प्रति पाउंडने घसरला. १९९७-२००४ पर्यंत भारतात ११० लाख कापसाच्या गाठी (Cotton Bales) आयात केली गेली. याचा परिणाम असा झाला की १९९४ मध्ये भारताच्या बाजारपेठेत कापसाचा भाव २५०० रु. प्रतिक्विंटल होता तो घटून १७०० रुपये झाला. याच कारणांमुळे आंध्रप्रदेशातील हजारो कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. महाराष्ट्रात कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कापूस एकाधिकार योजनेचं संरक्षण होतं. पण जेंव्हा महाराष्ट्र सरकारनी अग्रीम बोनस (६५० रु. प्रतिक्विंटल) बंद करण्याचा निर्णय घेतला तेव्हा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचं प्रमाण वाढलं. याच दरम्यान फक्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्याच आत्महत्यांचं प्रमाण वाढलं नाही तर केरळातील काळे मिरे, रबर, कॉफीचं उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणातही वाढ झालेली आढळली. पंजाब-हरियाणा इथं ही हेच घडत होतं.

शेतकऱ्याची आत्महत्या कृषी संकटातील Tip of the Ice berg आहे. मा. पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी ३० जून २००६ साली आमच्या गावाला, वायफड, जि. वर्धा येथे जेंव्हा ते आले त्यावेळी मी त्यांना सांगितलं होतं, '' जे शेतकरी आत्महत्या करीत नाहीयेत त्यांचं जीवनमानंही खालावलेलंच आहे. ते मेले नाहीत म्हणून फक्त जीवंत धरायचये इतकंच''. (He is living because he is not dying)

स्वातंत्र्यानंतर ६० वर्ष होऊनही शेतकऱ्यांची शेतीची अवस्था दयनीय आहे ही खरंच दुर्दैवाची बाब आहे. याच कारणामुळे कर्जाच्या ओझ्याखाली दडपल्या गेलेल्या शेतकऱ्यांसाठी भारत सरकारने २००८-२००९ च्या अंदाजपत्रकात ६० हजार कोटी रुपयांची कर्जमाफीची योजना जाहीर करुन शेतकऱ्यांना दिलास देण्याचा प्रयत्न केला आहे.

६० हजार कोटी रूपयांची रक्कम बघायला फार मोठी वाटते. पण ज्याप्रमाणे आमच्या देशात औद्योगिकरणाला उत्तेजन देण्यासाठी सबसिडी दिली जाते, शहरांच्या विकासासाठी सबसिडी दिली जाते, किंवा पहिल्या वेतन आयोगापासून ते पाचव्या वेतन आयोगापर्यंत जो पैसा दिला गेला त्या पार्श्वभूमीवर ही रक्कम फारच अल्प आहे. समुद्रात खसखशीचा दाणा असावा त्याप्रमाणेच.

भारत सरकारने या कर्जमाफी योजनेमध्ये २ हेक्टरपर्यंतची मर्यादा निश्चित करुन विदर्भातील शेतकऱ्यांवर अन्यायच केला आहे, परंतु देशातील सगळयाच राज्यातील असिंचनाची शेती (Non Irrigated) करणाऱ्या शेतकऱ्यांवरदेखील अन्याय झाला आहे. असिंचीत शेती करणाऱ्या शेतकऱ्याजवळ २ हेक्टरपेक्षा जास्त जमीन आहे पण त्यांच्यावर कर्ज कमी आहे. असिंचीत शेती करणारा शेतकरी हाच जास्त चिंतीत आहे कारण त्याला अनिश्चित निसर्ग (Vagaries of nature) आणि अनिश्चित बाजारपेठ (Vagaries of market) यांना तोंड द्यावे लागते. भारत सरकारने योजनेची घोषणा केलीये, त्यानुसार सिंचित  क्षेत्रातील शेतकऱ्यांना लाखों रुपयांचं कर्ज टॅक्टरसाठी, द्राक्षाच्या शेतीसाठी, रबर, कॉफी, व्हॅनिलाच्या शेतीसाठीदेखील घेतलेलं कर्ज माफ होईल. परंतु असिंचीत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचं ५०-६० हजारांचं किंवा फक्त १ लाख रुपयांचं कर्ज माफ होणार नाही. कारण त्याच्याजवळ २ हेक्टरपेक्षा जास्त जमीन आहे.

महाराष्ट्र सरकारने वर्तमानपत्रात जाहिरात  प्रसिध्द करुन असा दावा केलाय की या कर्जमाफी योजनेद्वारे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे ९३१० करोड रुपयांचं कर्ज माफ होईल. प्रश्न हा आहे की देशासाठी ६० हजार करोड रुपयाची घोषणा आणि महाराष्टाला त्याचा फक्त एक षठांश (१/६ ) हिस्सा दिला जाईल तर बाकी देशासाठी काय शिल्लक राहील ? दुसरं महत्वपूर्ण तत्थ्य हे आहे की या ९३१० करोड रुपयापैकी  विदर्भातील त्रस्त शेतकऱ्यांना १२०० ते १४०० कोटी रुपयांचा लाभ होणार आहे. याचा अर्थ उघड आहे की या कर्ज माफी योजनेमध्येही विदर्भाचा बॅक लॉग वाढणारच आहे. मी ३ मार्च २००८ रोजी सकाळी मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याशी फोनवर बोललो होतो, आणि त्यांना विनंती केली होती की कर्जमाफी योजनेमध्ये जमीन किती एकर अशी मर्यादा न घालता रकमेंची मर्यादा टाकावी. ५०-६० हजार रु. पर्यंत सगळ्या शेतकऱ्यांचं कर्ज माफ होईल ही घोषणा ९० टक्के शेतकऱ्यांना दिलासा देणारी असेल. या माझ्या म्हणण्यास मुख्यमंत्र्यांनीही दुजोरा दिला आणि त्यांनी श्रीमती सोनिया गांधींसोबत यावर चर्चा केली. परंतु आता ज्या बातम्या येताहेत त्या पार्श्वभूमीवर आम्हाला असे म्हणावे वाटते की असिंचित शेती करणाऱ्या सगळ्याच शेतकऱ्यांचं कर्ज माफ झालं पाहिजे. आणि याच कारणामुळे आम्ही ही मागणी करु इच्छितो की भारत सरकारच्या प्रत्येक तहसिलमध्ये कर्जमाफीच्या ६० हजार कोटी रु. रकमेतून किती किती रक्कम गेली आहे. याबद्दल श्वेत पत्रिका (White paper) प्रसिध्द व्हावी असे वाटते.

शेतकऱ्यांचं कर्ज माफ करणं एकवेळ  आवश्यक तर आहेच  पण आम्ही हे सांगू इच्छितो की  शेतकरी लाचार होऊ इच्छित नाही. शेतकऱ्यास भीक नकोय. त्याला त्याचा हक्क मिळाला पाहिजे. आम्ही वायफडमध्ये देखील मा. पंतप्रधानांना हेच सांगितलं होतं, की शेतकऱ्यांना कर्जाची परतफेड करण्याची शक्ती निर्माण करता आली पाहिजे. आणि ही शक्ती  कृषी उत्पादनाच्या निश्चित भावानेच प्राप्त होऊ शकते. जागतिक व्यापार संघटनेच्या व्यापाराची नीती अमेरिका- युरोपमधील शेतकऱ्यांना सबसिडी कमी करण्यात अयशस्वी झालीये. जागतिक  बाजारपेठेत गहू, तांदूळ, डाळ, खाद्यतेल या सगळ्यांचेच भाव वाढलेत. गव्हाचे भाव ६००-७०० डॉलर प्रतिटन आणि खाद्यतेलाचे भाव -पामतेल १२५० डॉलर प्रतिटन आहेत. कापूस आणि साखरेचे भावही दिवसेंदिवस वाढतच आहेत. भारत सरकारने भाव कमी

करण्यासाठी आयात कर (Import Duty) कमी केलीये. रुपयाची किंमतही वाढली आहे. पण भाव कमी करण्यासाठी सरकारी प्रयत्न यशस्वी होत नाहीयेत कारण डॉलरच्या भावात तेजी होते आहे.

शेतकऱ्यास कर्जमाफी नकोय तर कर्जापासून मुक्ती पाहिजे. सर्वसामान्य शेतकऱ्यांबद्दल बोलायचं झाल्यास त्याचं हेच म्हणणं आहे की आज बाजारात प्रमुख कृषी उत्पादनाचे जे भाव आहेत , त्यापेक्षा कमी भाव होता कामा नयेत. आणि सरकारने त्याबद्दल आश्वासन द्यावे. उदाहरणार्थ, आज बाजारात शेतकऱ्याला मिळणारा सोयाबिनचा भाव २०००-२२०० रुपये प्रतिक्विंटल, गव्हाचा भाव ११००-१२०० रुपये, कापूस २६००-२८०० रुपये प्रतिक्विंटल, शेंगदाणा २४००-२६०० रुपये प्रतिक्विंटल आहे. या पार्श्वभूमीवर भारतसरकारला कृषी उत्पादनाच्या समर्थनार्थ मूल्य निश्चित करण्याच्या नीतीवर पुनश्च विचार करणे आवश्यक आहे. ३० जून २००६ रोजी मा. पंतप्रधानांसमोर आम्ही हीच बाब ठेवली होती. आम्ही त्यांना विनंती केली होती की, पाचवा वेतन आयोगाची अंमलबजावणी केल्यानंतर गाव आणि शहरातील आर्थिक असमानतेत अधिक वाढ झालेली आहे. आता तर सहाव्या वेतनआयोगाची गोष्ट चालू आहे. आमची आपल्याला विनंती आहे की सहावा वेतन आयोगामध्ये कृषी कामगार बंधू, भगिनींचा समावेश व्हावा आणि सहावे वेतन आयोगाचे कमीत कमी वेतन, कृषी कामगाराचं वेतन असेल. हे लक्षात घेऊन कृषी मूल्य आणि लागत आयोग (CAPC) कृषी उपजच्या समर्थनमूल्य निश्चित करावे. हेच राष्ट्रीय किसान आयोगाचे अध्यक्ष डॉ. स्वामीनाथन यांनीही म्हटले होते की ''शेतीचा विकास, उत्पादन किती वाढते आहे यावर मोजता कामा नये तर शेतकऱ्याचं उत्पन्न किती वाढत आहे यावरुन मोजायला पाहिजे''. त्यांनी शेतकऱ्यास योग्य भाव मिळावा यासाठी WTO ला समांतर ITO (Indian Trade Organization) चा उपाय सुचवला आहे. अमेरिका-युरोपमधील शेतकऱ्यांना ॲम्बर बॉक्स, ब्लू बॉक्स, ग्रीन बॉक्सची सबसिडीची व्यवस्था आहे- त्याचप्रमाणे भारत सरकारने लाईव्हली हूड बॉक्सची रचना करायला पहिजे. भारत सरकारच्या कृषी मूल्य आयोगाने कृषी उत्पादनाचे भाव निश्चित करण्याच्यावेळी C२+१५% नफ्याचा फार्म्युला बदलवून C२+५०% नफ्याचा हिशोब लावून समर्थन मूल्य निश्चित केले पाहिजे. डॉ. स्वामीनाथन प्राईस स्टेबलाईझेसन फंड उभा करण्याची शिफारस केली गेलीय. (भाव स्थिर करण्यासाठीचा कोष)

भारत सरकार एप्रिल २००८ मध्ये सहावा वेतन आयोग स्वीकारण्याचा विचार करीत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण अर्थव्यवस्थेत बदल होणं जरूरी आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेमधील मजुरी ६० रु पासून वाढून निश्चित होणे आवश्यक आहे. शेतीत काम करणाऱ्या मजुरालाही तीच मजुरी मिळायला हवी. त्यासाठी पीकांच्या भावाची नीती ठरणे आवश्यक आहे. आमच्या देशातील गरीबांना अन्नधान्य स्वस्त भावात देण्याची जबाबदारी आम्ही टाळत नाही परंतु गरीबांना स्वस्त धान्य द्यायचं असं म्हणत अन्न पिकवणाऱ्या त्याच गरीब शेतकऱ्याला आणखी गरीब करायचं ही राजनीती किती काळ चालणार हा प्रश्न आहे. विदर्भातील शेतकऱ्याने तर ज्वारीचं पीक घेणं बंदच केलं आहे. केरळमधील शेतकऱ्यांनी तांदळाचं उत्पादन बंद केलंय. उद्या पंजाब-हरियाणाच्या शेतकऱ्यांनी जर गहू आणि तांदूळ यांची शेती करणं बंद केलं तर आमच्या देशातल्या ११० कोटी लोकांसाठी अन्न कुठून येईल ?

अन्नसुरक्षेसाठी अन्नदात्या शेतकऱ्यास माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त झालाच पाहिजे.

**विजय जावंधिया,**
शेतकरी संघटना पाईक,
रामनगर-वर्धा.
**shetsangh@rediffmail.com**
अनुवाद-दीपा देशमुख,
निर्माण समन्वय टीम.
**deepad@mkcl.org**